# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

ISSN 2319-8648 | Impact Factor - 7.139 | Indexed (SJIF)

November 2020 Special Issue- 20 Vol. I


# Human Rights





Chief Editor
Mr. Arun B. Godam

Guest Editor
Principal Dr. Kishan Pawar


Human Rights

Current Global Reviewer


Indexed (SJIF)

ISSN 2319-8648

Impact Factor- 7.139

ISSN 2319-8648

**54.** सामाजीक न्यायसाठी मानवी हक्काची आवश्यकता 152
प्रा.धिमधिमे किरणकुमार मोहन

**55.** मानवी हक्क आणि बालकांची समस्या - एक समाजशास्त्रीय चिंतन **154**
प्रा.डॉ. यादव घोडके

**56.** "स्त्रीविरोधी हिंसाचार आणि मानवी हक्क" **157**
डॉ. ज्ञानोबा विठ्ठलराव पडोळे

**57.** मानवी हक्क : १९४२ च्या चळवळीचे भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील योगदान **160**
प्रा.राजकुमार ज्ञानोबा चाटे

**58.** "धार्मिक हिंसाचार, आतंकवाद आणि मानवी हक्क" 163
प्रा. डॉ.घायाळ एस.टी.

**59.** मानवी हक्क आणि महिला संरक्षण **165**
डॉ. विठ्ठल भिमराव मातकर

60. मानवी हक्क आणि दहशतवाद समस्या **168**
प्रा. डॉ. चव्हाण सुखदेव गोविंदराव

**61.** मानव अधिकार आणि सामाजिक न्याय **170**
डॉ. फुलचंद सलामपूरे

**62.** ''मानवी अधिकार आणि सामाजिक न्याय'' 171
डॉ. सुनंदा एकनाथराव आहेर

**63.** "मानव अधिकार आणि नक्षलवादी चळवळीचा समाजशास्त्रीय अभ्यास" **174**
डॉ. तांदळे एस.एस.

**64.** "मानवी हक्क व संरक्षण " **176**
प्रा. डॉ. विजय पोकळे

**65.** सामाजिक न्याय आणि मानवी अधिकार **178**
प्रा. गायकवाड प्रभाकर काशिनाथ

**66.** भारतातील मानवी हक्काचे उल्लंघन एक अभ्यास **180**
प्रा. पोपळघट आर. एस.

**67.** "मानवी हक्क आणि महिला हिंसाचार" **183**
प्रा. आर.बी. काळे

**68.** मानवी हक्क आणि सामाजिक न्याय **186**
प्रा. डॉ. विनोद बी. खेडकर

**69.** मानवी हक्क व बालकामगार निर्मुलनाचे उपाय: समाजशास्त्रीय अभ्यास **189**
प्रा. पोकळे एस.एम.

**70.** भारतातील प्रादेशीक विकासातील असमतोल आणि मानवी अधिकार **192**
प्रा.डॉ.विकास चांगदेव शिनगारे

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 29 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648

November 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

# "मानवी हक्क आणि महिला हिंसाचार"

**प्रा. आर.बी. काळे**

समाजशास्त्र विभाग, र.भ. अट्टल महाविद्यालय, गेवराई जि. बीड

---

**प्रस्तावना :**

मानवाला आपले जीवन योग्य प्रकारे जगता यावे म्हणून निसर्गाने काही अधिकार मानवाला निसर्गतः बहाल केलेले आहेत. त्या अधिकाराला नैसर्गिक अधिकार देखील म्हटले जाते. परंतु प्रत्येक कालखंडातल्या आणि प्रत्येक देशातल्या प्राचीन समाजाचा इतिहास पाहिला तर असे दिसून येते की, प्रत्येक धर्म आणि आधार कोणताही असो शोषक आणि शोषित असे दोन वर्ग समाजात अस्तित्वात असल्याचे दिसून येते. मानव जन्मतः काही हक्क घेऊन जन्माला येतो.

नैसर्गिक व सामाजिक न्यायासाठी मानवी हक्क महत्त्वपूर्ण भूमिका निभावतात. मानवी कुटुंबातील सर्व व्यक्तीची प्रतिष्ठा व अधिकाऱ्यांना मान्यता देणे मग ही व्यक्ती स्त्री असो अथवा पुरूष दोघांनाही मानवी अधिकारापासून वंचित ठेवू शकत नाही. कारण मानवी हक्क आयोगाने स्त्री -पुरूष दोन्ही समान संबोधले आहे.सर्वांना मुक्तपणे जगता यावे आणि आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करता यावा म्हणून मानव म्हणून मिळालेल्या हक्काचे रक्षण करावे. म्हणून जागतिक पातळीवर १० डिसेंबर १९४८ रोजी मानवी हक्क आयोगाची स्थापना केली आणि त्यानंतर प्रत्येक देशात आपल्या जनतेच्य हिताचे रक्षण करावे असे निश्चित करण्यात आले.

**शोधनिबंधाचे उद्देश :**

१) मानवी अधिकाराची संकल्पना अभ्यासणे.

२) महिला हिंसाचाराची सद्यस्थितीचा आढावा घेणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोध निबंधासाठी दुय्यम तथ्य संकलन पध्दतीचा अवलंब केलेला असून त्यासाठी संदर्भग्रंथ, पुस्तके, मासिके, वर्तमानपत्र आणि इंटरनेटवर उपलब्ध असलेल्या माहितीचा आधार घेण्यात आलेला आहे.

**मानवी हक्काचा अर्थ :**

मानवी हक्काची संकल्पना मानव मात्रातील मुलभूत समतेच्या गृहितकावर आधारित आहे. मानव हा जन्मतः चमुक्त आणि समान आहे. म्हणून त्याला कोणत्याही भेदभावावर हित, समान वर्तणुकीची हमी दिली पाहिजे. त्यामुळे समान वागणूक आणि भेदभावाचा अभाव या मानवी हक्क विचारातील मुलभूत संकल्पना आहेत.

**रँडम हाऊस विश्वकोश :**

मानवी हक्क म्हणजे व्यक्तीला जन्माने प्राप्त झालेले अधिकार जे व्यक्तीला सन्मानाने जगण्यासाठी अत्यावश्यक आहेत.

**बेंथम :**

कायद्याने मान्य केलेली स्वीकृती दिलेली व्यक्तीची मागणी म्हणजे अधिकार होय. जगातील प्रत्येक व्यक्तीला ती मानव आहे. या एकाच कारणास्तव ज्या अधिकाराची प्राप्त होणे गरजेचे असते त्या अधिकाराला मानवी अधिकार असे म्हणतात.

**प्रा.एच.के. लास्की :**

यांच्यामते मानवी हक्क म्हणजे सामाजिक जीवनाची अशी परिस्थिती की, ज्याच्याशिवाय व्यक्तीला सामान्य स्वतः चा सर्वांगीण विकास करून घेणे शक्य होत नाही.

**मानवी हक्क महिला विषयक अधिकार व कायदे :**

मानवी हक्क आयोगाने स्त्री आणि पुरूष दोन्ही समान आहेत असे संबोधले असले तरी समाज व्यवस्थेचे चित्र पाहता असे असल्याचे दिसून येत नाही. १९७९ मध्ये महिलांवर अत्याचार दूर करण्यासाठी अधिवेशन झाले हे जागतिक पातळीवर महिलांच्या दृष्टीने होणारे परिवर्तनाचे पहिले द्योतक होय. १९९३ ला व्हिएन्नामध्ये मानवी हक्कांवर संमेलन झाले. यामध्ये जगभरातल्या महिलांवर होणाऱ्या अत्याचाराविषयी चर्चा करण्यात आली. भारतामध्ये १२ ऑक्टोंबर १९९३ साली मानवी आयोगाची स्थापना झाली. तेंव्हापासून त्याची अमंलबजावणी करण्याचा प्रयत्न केला जात आहे. भारतात १९९३ ला मानवी हक्क संरक्षण कायदा पारित केला गेला. मानवी हक्क संरक्षण कायद्याचा मुलभूत अधिकार म्हणजे समानता होय. कोणत्याही प्रकारची जात, लिंगभेद न करता सर्वांना समानतेने जगण्याचा मुलभूत अधिकार आहे. देशातील किंबहूना जगातील लोकसंख्येचे ५० टक्के जनसंख्या महिलांचे आहे. त्यामुळे महिला आणि त्यांचा विकास हा देशाच्या विकासात मोलाचे योगदान देऊ शकतो. महिलांना हक्क दिले की, आपली जबाबदारी संपली असे नाही. हक्क आणि त्यांची योग्य अंमलबजावणी ही गरजेची आहे. तितकेच त्यांना सक्षम करणे महत्त्वाचे आहे.

महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि सुरक्षिततेसाठी शासनस्तरावर विविध कायद्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे. परंतु त्याही अगोदरपासून वेदांमध्ये आणि स्वातंत्र्यानंतरच्या संविधानामध्ये महिलांच्या हक्काचे रक्षण करण्याचे मोठ्या प्रमाणात प्रयत्न झाले आहेत ते पुढील विश्लेषणातून दिसून येईल किंवा याविषयी जागृती निर्माण करण्यासाठी महिलांशी संबंधित कायदे विवाह संबंधित कायदे.

**कलम ३०४ :** नुसार लग्नानंतर सात वर्षाच्या आत एखाद्या स्त्रीचा मृत्यू झाला आणि मृत्यूपूर्वी जर तिच्या शरीरावर जाळण्याचे शरीराच्या भागावर जखमा झाल्याचे निदर्शनास आले तर तसेच मृत्यूपूर्वी हुंड्यासाठी तिचा छळ झाल्याचे स्पष्ट झाले तर दोषी व्यक्तीला कमीत कमी सात वर्षाची शिक्षा किंवा जन्मठेप होऊ शकते.

**कलम ३६६ :** नुसार एखाद्या मुलीला पळवून नेणे लग्नासाठी मुलीवर जबरदस्ती करणे अशा कृत्यासाठी व्यक्तीला १० वर्षापर्यंत शिक्षा व दंड होऊ शकतो.

**कलम ३७६ :** नुसार बलात्कारासारख्या गंभीर गुन्हा असेल तर सात वर्ष शिक्षा दंड व जन्मठेप या शिक्षा होऊ शकतात.

**कलम ४९३ :** नुसार लग्नाचे आमिष दाखवून एखाद्या स्त्रीशी शारीरिक संबंध ठेवले तर व नंतर लग्नास नकार देत असेल तर दोषीला दहा वर्षापर्यंत शिक्षा व दंड होऊ शकतो.

**कलम ४९८ :** नुसार हुंड्यासाठी छळ झाल्यास दोषींना कायद्यानुसार शिक्षा होऊ शकते.

**कलम ५०९ :** एखाद्या स्त्रीला उद्देशून बोलणे, वाईट नजरेने पाहणे, अपशब्द वापरणे असे वर्तन केले तर त्या व्यक्तीला एका वर्षापर्यंत शिक्षा व दंड होऊ शकतो.

**कलम २९४ :** नुसार स्त्री छेडछाड केली तर तीन महिन्यापर्यंत शिक्षा होऊ शकते.

**महिलांशी संबंधित कायदे :**

१) हिंदू विधवा पुर्नविवाह कायदा -१८५६.
२) भारतीय घटस्फोट कायदा -१८६९.
३) वैद्यकीय गर्भपात कायदा -१९२९.
४) बालविवाह प्रतिबंधक कायदा -१९२९.
५) हिंदू विवाह कायदा -१९५५.
६) स्त्रियांचा संपत्तीचा कायदा -१९५९.
७) हुंडा प्रतिबंध कायदा -१९६१.
८) मातृत्व लाभ संबंधित कायदा-१९६१.
९) वैद्यकीय गर्भपात अधिनियम कायदा-१९७६.
१०) अश्लील व विभत्स प्रदर्शन बंदी कायदा-१९८६.
११) लिंग निदान प्रतिबंध कायदा -१९९४.
१२) कौटुंबिक हिंसाचार संरक्षण कायदा-२००५.
१३) नोकरीच्या ठिकाणी लैंगिक शोषणापासून महिलांचे संरक्षण विधेयक -२०१०.

अशा प्रकारचे बरेच कायदे महिलांच्या सबलीकरणासाठी अस्तित्वात आहेत. महिला हक्कांचे बळकटीकरण व अमंलबजावणी काळाची गरज आहे. मुलींच्या जन्माला प्राधान्य देण्यासाठी माझी कन्या भाग्यश्री, सुकन्या योजना, बेटी बचाव, बेटी पढाव ११ जानेवारी २०१५ मध्ये योजना सुरू करण्यात आली. महिलांसाठी निवारगृह, महिलांसाठी प्रशिक्षण आणि रोजगार कार्यक्रम ासारख्या विविध योजना सरकार राबवित आहे असे असले तरी महिला या अन्याय व अत्याचाराला बळी पडताना दिसून येत आहे.

**महिला हिंसाचाराची सद्यस्थिती :**

नैतिक पातळीवर आणि कायदेशीर पातळीवर महिलांच्या हक्कासाठी उपाय केलेले असून सुध्दा महिलांवरील अत्याचार कमी होताना दिसत नाही. महिलांवर अत्याचार करणाऱ्यामध्ये हे महिलांचे नातेवाईक आणि पूर्वपरिचित लोकांचा समावेश असतो, असे दिसून येते. आजच्या काळात महिला विरूध्द होणाऱ्या अत्याचारात रस्त्याने छेडछाड, प्रवासात छेडछाड किंवा घरी राहणाऱ्या स्त्रियांच्या एकटेपणाचा फायदा म्हणून होणाऱ्या अत्याचाराबरोबरच मोबाईल व इंटरनेटच्या साह्याने देखील गुन्हे घडताना दिसून येतात. वर्तमान काळात भारतीय महिला सामाजिक आणि राजकीय क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर कार्य करत आहेत. परंतु यामुळे त्यांना घरगुती हिंसेव्यतिरिक्त प्रवास करताना कामाच्या ठिकाणी किंवा दळणवळणाच्या माध्यमातून होणाऱ्या त्रासाला सामोरे जावे लागते. सध्याच्या Covid-१९ या महामारीच्या निमित्ताने लॉकडाऊनमध्ये कौटुंबिक हिंसाचार, बलात्कार, घटस्फोटही प्रकरणे वाढत आहे. स्पेन २० टक्के, फ्रान्स ३० टक्के, इंग्लंड २५ टक्के, तुर्की १४ टक्के महिलांच्या जोडीदाराने खून केला तर ब्राझील, सिंगापूर, चीन इत्यादी देशात महिला अत्याचाराचे प्रमाण वाढत आहे. भारत ही त्याला अपवाद नाही. सद्यस्थितीत भारतात २३ मार्च ते १६ एप्रिल दरम्यान राष्ट्रीय महिला आयोगाकडे ५८७ तक्रारीची नोंद करण्यात आली. त्यापैकी २३९ तक्रारी या केवळ कौटुबिक हिंसाचार याबाबत आहेत. मागील काही वर्षांमध्ये मी टू ही मोहीम जगभरात स्त्रियांवर होणाऱ्या लैंगिक अत्याचाराविरूध्द शारीरिक शोषणाविरूध्द मि टू च्या माध्यमातून वाचा फोडली जात आहे. मी टू मोहिम विविध क्षेत्रात कार्यालयीन वातावरणात किंवा कामाच्या ठिकाणी विशेषत: महिलांवरील होणाऱ्या लैंगिक अत्याचाराविरोधात वाचा फोडत आहे. याचा अर्थ असा की मि टू या मोहिमेच्या माध्यमातून समाजामध्ये वेगवेगळ्या या सर्व क्षेत्रात विशेषत: हॉलिवूड असेल बॉलिवूड असेल तसेच पत्रकारिता या क्षेत्रात देखील महिलांवर अत्याचाराच्या घटना खूप मोठ्या प्रमाणात घडल्या आहेत. देश पातळीवर महिलांवर बलात्कारांच्या घटना वाढत आहेत. २०१५ मध्ये ३४६५१, २०१६ मध्ये ३८९४७, २०१७ मध्ये ३२५५९, २०१८ मध्ये ३३३५६ बलात्काराच्या घटना झालेल्या आहेत. जवळपास भारतात पंधरा मिनिटाला एक बलात्काराची घटना घडते. इतक्या मोठ्या प्रमाणात महिलांवर अत्याचारांचे प्रमाण वरील आकडेवरून लक्षात घेता येते. त्याचबरोबर २०१९ या वर्षात ७३९ हुंडाबळीच्या घटना घडलेल्या आहेत. २०११ च्या जनगणनेनुसार दर हजार पुरूषामागे ९४० स्त्रियांचे प्रमाण आहे याचा अर्थ असा की, हजार पुरूषांमागे ६० स्त्रिया कमी आहेत. याचे कारण आपल्याला असे लक्षात घेता येते की, भारतीय समाजात मुलाला अतिरिक्त महत्त्व असल्याने महिलांना लिंग भेदाला सामोरे जावे लागत आहे. परिणामी स्त्री भ्रूणहत्या वाढलेली आहे. त्याचबरोबर २०११ च्या जनगणनेनुसार शिक्षणाचे प्रमाण स्त्रियांचे ६५.५ टक्के आहे तर पुरूषांचे प्रमाण ८२.५ टक्के आहे. यावरून असे लक्षात येते की, भारतीय समाजात स्त्रियांना शिक्षण देण्याचा कल हा कमी आहे. म्हणजे शिक्षणाच्या संदर्भात सुध्दा स्त्री-पुरूषामध्ये विषमता आपल्याला पाहायला मिळते.

**सारांश :**

स्त्रियांविरूध्द होणाऱ्या गुन्ह्यामध्ये किंवा अत्याचारांमध्ये घट घडवून आणायची असेल तर प्रत्येक कुटुबांने आपल्या पाल्यांचे योग्य सामाजिकरण करणे. महिलांच्या व्यवसायीकरणावर बंदी आणणे, प्रचार व प्रसार माध्यमांनी महिलांना आपली हक्काची जाणीव करून देणे. सामाजिक मूल्यांची शिकवण देणे आवश्यक आहे. भारताच्या दृष्टीने विचार करता जनसामान्यापर्यंत मानवी हक्काविषयी जागरूकतेचा अभाव असल्याने विशेषत: महिलांना अन्याय व अत्याचाराला बळी पडावे लागत आहे.

शहरी संस्कृतीमध्ये वाढलेल्या विकृतीमुळे आज शहरी महिलांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. म्हणून केवळ वैयक्तिक पातळीवरच उपाय करून चालणार नाही तर गुन्हेगारावर निर्बंध घालण्यासाठी काटेकोरपणे कायद्याची अमंलबावणी करून गुन्हेगाराला कडक

शिक्षा देणे आाि न्याय प्रक्रियेत गती आणणे गरजेचे आहे. त्याचबरोबर स्त्री-पुरूष दोघांची मानसिकता बदलणे गरजेचे आहे. त्याची सुरूवात प्रत्येकाने स्वत:पासून करणे आवश्यक आहे. महिलांच्या मानवी हक्काचे जतन व संरक्षण झाले तरच देश सामाजिक व आर्थिक सक्षम होईल.

**संदर्भ :**

१) सुधाराणी, श्रीवास्तव, भारत मे मानवाधिकार के अवधाराणा, अर्जुन पब्लिशिंग हाऊस नई दिल्ली-२००१.
२) नदीम हसेन, समकालीन भारतीय समाज, भारत बुक सेंटर, लखनऊ.
३) महारोत्रा, ममता, महिला अधिकार व मानवाधिकार, प्रभात प्रकाशन कानपूर-२०११.
४) देवळानकर, शैलेंद्र, समकालीन जागतिक राजकारण, विद्या बुक्स पब्लिकेशन, औरंगाबाद-२०१०.
५) maharashtratimes.com.dated२५.८.२०२०.
६) newindianexpress.com.dated२५.८.२०२०.
७) censusindia.gov.in dated २६.८.२०२०.